अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे,
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती (स्वायत्त)
समाजशास्त्र विभाग

दि. १७/०९/२०२२

प्रति,

मा. प्राचार्य,

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,

बारामती

विषय: एक दिवसीय उद्योजकता विकास कार्यशाळेचा अहवाल....

महोदय,

राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (RUSA) आणि उद्योजकता विकास योजने अंतर्गत, आपल्या महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागाच्या वतीने "उद्योजक व्हा" या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन शनिवार, दि. १७/०९/२०२२ रोजी करण्यात आले होते. या कार्यशाळेत मा. श्रीनिवासन मगदूम, (विभागीय संचालक, वनिता ॲग्रो प्रा, ली. सातारा आणि पुणे विभाग) यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. उद्योजक होण्यासाठी शेती आणि पर्यावरण यांचा समतोल साधून शेतीत जास्तीत ज़ास्त उत्पन्न कसे घेता येईल या विषयी त्यांनी आपल्या परिसरातील शेतकऱ्यांची उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शेती व्यवसाय आधुनिक पद्धतीने कसा करता येईल या विषयी मार्गदर्शन केले. तसेच शेती व्यवसायसाठी विविध योजनाची माहिती देण्यात आली. मार्गदर्शनानंतर विद्यार्थ्यांशी विविध प्रश्नावर चर्चा झाली. या कार्यशाळेत पदवी प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष, तृतीय वर्ष या वर्गातील एकुण ८८ विद्यार्थी सहभागी झाले.

या कार्यशाळेचे स्वागत व प्रास्ताविक समाजशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी केले. तसेच सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन समाजशास्त्र बिभागातील विद्यार्थ्यांनी केले. या कार्यशाळेचे यशस्वीरीत्या पार पाडण्याकरिता मा. संस्थाचालक, मा. प्राचार्य, सर्व मा. उपप्राचार्य तसेच महाविद्यालयाचे रजिस्ट्रार यांनी मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य केले. धन्यवाद.

कार्यशाळा समन्वयक
प्रा. नितीन चव्हाण

विभागप्रमुख
प्रा. विनायक लष्करी

## अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे,
## तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती (स्वायत्त)
## समाजशास्त्र विभाग

-------------------------------------------------------------------------
-------------------------------------------------------

एक दिवसीय उद्योजकता विकास कार्यशाळा दि. १७/०९/२०२२

- प्रमुख वक्त्ये मार्गदर्शन करताना






समाजशास्त्र विभागप्रमुख मार्गदर्शन करताना




विद्यार्थी प्रश्न विचारताना

